# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २८ जून, २०१९ / आषाढ ७, १९४१ (शके)**

| | |
|---|---|
| (१) उद्योग, खनिकर्म मंत्री<br>(२) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(३) पणन व वस्त्रोद्योग मंत्री<br>(४) सहकार मंत्री<br>(५) सामाजिक न्याय मंत्री<br>(६) आदिवासी विकास मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४०**

---

**धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत**

**(१) * ४६५८७ श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विलास पोतनीस, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक ४४००४ ला दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबाबतचा अभ्यास अहवाल टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस (टीस) या संस्थेने शासनाला सादर करुन ९ महिन्यांचा कालावधी झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालातील शिफारशी कोणत्या आहेत व त्यानुषंगाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, राज्यातील धनगर समाजाच्या आरक्षण संदर्भात धनगर समाजाच्या सर्वपक्षीय नेत्यांनी मा.मुख्यमंत्री यांची भेट घेतली असल्याचे दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून या बैठकीत धनगर समाजाच्या आरक्षणासंदर्भात राज्याच्या महाअधिवक्त्यांसोबत निर्णायक बैठक आयोजित करण्यात येईल असे शासनाने आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस (टीस) च्या अहवालाच्या अनुषंगाने राज्यातील धनगर समाजाच्या विविध मागण्यांवर निर्णय घेण्यासाठी शासनाने मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत केली असल्याचे दिनांक २ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून ही समिती धनगर समाजाच्या मागण्यांवर कधीपर्यंत निर्णय घेणार आहे,

(५) असल्यास, धनगर समाजाने आरक्षणासाठी लोकशाही मार्गाने सातत्याने आंदोलने सुरु ठेवली असून शासनाने तात्काळ याबाबतचा निर्णय घेण्याबाबतची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१), (२), (३), (४), (५) व (६) टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांनी दिनांक ३१/०८/२०१८ रोजी धनगर समाजाबाबतचा त्यांचा अहवाल शासनास सादर केलेला आहे. यासंदर्भात मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २७/०२/२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांचेकडून धनगर समाजाबाबत शासनास प्राप्त झालेल्या संशोधन/ सर्वेक्षण अहवालाच्या अनुषंगाने धनगर समाजाच्या विविध मागण्यांवर विचार करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुषंगाने शासन निर्णय

दिनांक ०१/०३/२०१९ अन्वये मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर मंत्रिमंडळ उपसमितीची पहिली बैठक दिनांक ०२/०३/२०१९ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये काही कायदेशीर मुद्‌यांबाबत मा.महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांचे अभिप्राय घेण्याबाबतचा निर्णय झाला. त्यानुषंगाने विधी व न्याय विभागामार्फत मा.महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

-----------------

## परभणी येथील जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयातील गैरकारभाराबाबत

**(२) * ४६८७३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ४४९८९ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयातील दलाल, कंत्राटी कर्मचारी, प्रभारी वरिष्ठ अधिकारी यांच्यातील असमन्वयामुळे विद्‌यार्थी, नोकरदार, लोकप्रतिनिधी यांना त्रास होत असल्याने वरील सर्वांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी लक्षवेधीव्दारे (डिसेंबर, २०१८) विधान परिषदेत केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सचिवस्तरावरून चौकशी व एक महिन्यात अंतिम कार्यवाही करण्याबाबतचे आश्वासन सदरील लक्षवेधीच्या उत्तरात दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर्थिक अडवणुक करून फाईली गायब करणे, त्रुटींची पुर्तता करूनही कागदपत्रे गहाळ करणे, प्रकरणे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवणे व इतर कारणे दाखवून जनतेची लूट केली असल्याबाबत सचिवानी चौकशी करून अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्याकरीता प्रधान सचिव (सामाजिक न्याय) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर प्रकरणी चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुसद (जि.यवतमाळ) येथील इलेक्ट्रिक पोलवरील लोड कमी करण्याबाबत

**(३) * ४७४२९ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) येथील मुख्य कापड बाजारपेठ व नगिना मस्जिद चौकातील एकाच इलेक्ट्रिक पोलवर विजेच्या अनेक जोडण्या असल्याने लोड वाढून वारंवार स्पार्किंग होऊन आगीची दुर्घटना घडण्याची स्थिती निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार इलेक्ट्रिक पोलवरील लोड कमी करून कुठल्याही प्रकारची दुर्घटना घडू नये यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) मौजे पुसद जिल्हा यवतमाळ येथील नगिना चौकात लघुदाब विद्युत वाहिनीच्या खांबावर कट पॉईट असल्यामुळे येथील सैल झालेले जम्पर दुरुस्ती योग्य प्रकारे लावण्यात आले व स्पार्किंग होण्याच्या तक्रारीचे निरसन

करण्यात आले आहे. तसेच या ठिकाणच्या विद्युत खांबावरील भार कमी करुन कुठल्याही प्रकारची दुर्घटना होऊ नये यासाठी याच ठिकाणी २०० के.व्ही.ए. चे नविन रोहित्र उभारुन एरिअल बंच केबलद्वारे दोन अतिरिक्त सर्किट काढण्यात आले आहे. अशाप्रकारे जुन्या २०० के.व्ही.ए. रोहित्राचा भार कमी करण्यात आल्यामुळे ओव्हरलोडींगच्या तक्रारीचे निरसन करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अपंग शाळेत स्वच्छता कर्मचारी व सुरक्षारक्षक पदे निर्माण करण्याबाबत

**(४) * ४७७३७ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, ॲड.अनिल परब** : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंग शाळेतील सफाई कामगार, काळजीवाहक व पहारेकरी ही पदे कंत्राटी पध्दतीवर कामकाज करण्यास तयार नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून राज्यातील संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळेत स्वच्छता (साफसफाई) कर्मचारी नसल्याने आणि रात्री सुरक्षारक्षक हे मानधनावर काम करण्यास तयार नसल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सफाई कामगार, काळजीवाहक व पहारेकरी ही पदे निर्माण करुन पूर्ण वेतनावर नेमण्याची मागणी शाळा व्यवस्थापनाकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील पदे पूर्णवेळ भरण्यासाठी शासन विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) अपंगांच्या शाळा/कर्मशाळेतील सफाईगार, पहारेकरी व काळजीवाहक या पदांना नियमित वेतनश्रेणी देण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टोरंट पॉवर कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत

**(५) * ४७६२३ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील भिवंडी शहरासह ग्रामीण भागातील विद्युत वितरण व बील वसुलीचा ठेका २००७ पासून टोरंट पॉवर कंपनीस विद्युत वितरण कंपनीने दिला असून हा कालावधी पूर्ण झाल्यांनतर पुन्हा १० वर्षासाठी याच कंपनीला केवळ १०० रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर करार करून शासनाचे कोट्यवधी रुपयांचे मुद्रांक शुल्क या कंपनीने बुडविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या टोरंट पॉवर कंपनीने विद्युत वितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने मुद्रांक शुल्क बुडविल्याबाबत चौकशी करण्याची मागणी राज्याच्या मुख्य सचिवांकडे मानव हक्क मंचाचे अध्यक्ष यांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुद्रांक शुल्क बुडविणाऱ्या टोरंट कंपनीला जिल्हाधिकारी, ठाणे यांनी जवळपास १ कोटी ८५ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन या प्रकरणास जबाबदार असणाऱ्या विद्युत वितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करुन टोरंट कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मे.टोरंट पॉवर कंपनीचा महावितरण कंपनीसोबत झालेला मुदतवाढीचा करार रुपये ५०० च्या स्टॅम्प पेपरवर करण्यात आला आहे.

(२) व (३) या प्रकरणी मुद्रांक शुल्क अधिकारी (ठाणे ग्रामीण) यांचेकडून दिनांक ७/१०/२०१७ रोजी रुपये १,८७,४६,८३०/- रकमेचा भरणा करणेबाबत मे.टोरंट पॉवर कंपनीस मागणीपत्र दिले होते. सदर मागणी अयोग्य असल्याचे मे.टोरंट पॉवर कंपनीची भूमिका असल्याने याबाबत मुद्रांक शुल्क अधिकारी (ठाणे ग्रामीण) यांचेकडे दिनांक ७/०५/२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीअंती रुपये १,०१,०४,७००/- रक्कमेचे मुद्रांक शुल्क भरण्याबाबत मे.टोरंट पॉवर कंपनीला आदेश देण्यात आले. सदर आदेशाविरुध्द मे.टोरंट पॉवर कंपनीने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केली असून त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरीम आदेशानुसार रुपये २५,१५,०००/- ची रक्कम मुद्रांक शुल्क अधिकारी (ठाणे ग्रामीण) यांचे कार्यालयात मे.टोरंट पॉवर कंपनीने जमा केली आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धसई (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील विद्युत पोल व तारांच्या दुरुस्तीबाबत

**(६) * ४६६४१ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धसई (ता.मुरबाड, जि.ठाणे) गावांमधून सुमारे ४ हजार किलोवॅट क्षमतेच्या विद्युत वाहिन्या जात असून, सडलेले, गंजलेले पोल, ५० वर्षापूर्वीचे डी.पी. व लोंबकळणाऱ्या विद्युत वाहिन्यांमुळे या गावात राहणाऱ्या हजारो विद्यार्थी व ग्रामस्थांचा जीव धोक्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धसई गावातील सुमारे ५० वर्षापूर्वीचे डी.पी. व लोंबकळणाऱ्या वीज वाहिन्या विनाविलंब बदलण्यात याव्यात म्हणून ग्रामपंचायत सदस्य व अन्य ग्रामस्थांनी मागील २ वर्षापासून महावितरणकडे मागणी केलेली असतानाही महावितरणकडून दुर्लक्ष झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू सडलेले पोल, जुने डी.पी. तसेच लोंबकळणाऱ्या वीज वाहिन्या बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) धसई गावातील २१ खराब व गंजलेले पोल व ५ किमी लोंबकळणाऱ्या तारा बदलण्यात आलेल्या आहेत. धसई गावातील सडलेले पोल व जुने डी.पी. तसेच लोंबकळणाऱ्या वीज वाहिन्या बदलण्याबाबतचे काम पंडीत दीनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजनेंतर्गत मंजूर असून ह्या कामाचा कार्यादेश दिलेल्या कंत्राटदाराने काम न केल्यामुळे कार्यादेश रद्द करुन सदर कामाकरीता पुन्हा निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तारापूर (जि.पालघर) येथील कारखाने पाणी पुरवठ्याअभावी बंद राहिल्याबाबत

**(७) * ४७१४७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, अ‍ॅड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुजरात गॅस लिमिटेड कंपनीची पाईपलाईन टाकताना खोदकाम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी दिनांक २३ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास एमआयडीसीची सांडपाणी वाहून नेणारी पाईपलाईन फोडल्यामुळे एमआयडीसीमधील कारखांन्याना दोन दिवस पाणीपुरवठा करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त एमआयडीसीमधील कारखान्यांना दोन दिवस पाणीपुरवठा करण्यात आला नसल्याने कारखांन्याचे उत्पादन बंद झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पाईपलाईन दुरुस्त करणारे कर्मचारी पालघर नगरपरिषदेच्या निवडणूकीच्या कामात व्यस्त असल्याने पाईपलाईन दुरुस्ती होऊ शकली नाही तसेच सदर कंपनीची पाण्याची पाईपलाईन गेल्या सहा महिन्यात तीन वेळा फुटल्यामुळे त्या परिसरातील उद्योजकांमध्ये तीव्र नाराजी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हॉरिझॉन्टल डायरेक्ट पध्दतीने जमिनीखालून ड्रिलिंग मशीनने गुजरात गॅसचे खोदकाम असल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) नैसर्गिक वायु वाहिनी टाकताना मे.गुजरात गॅस लि. या कंपनीकडून खोदकाम करताना दिनांक २३/०३/२०१९ रोजी सांडपाणी वाहून नेणारी वाहिनी फुटल्यामुळे सदर वाहिनीच्या दुरूस्तीच्या दिनांक २३/०३/२०१९ ते दिनांक २४/०३/२०१९ या कालावधीत फक्त संप क्र. ३ च्या परिक्षेत्रातील एल,एम व एन विभागातील कारखानदारांचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता.

(२) म.औ.वि. महामंडळाच्या नियमानुसार उद्योजकाच्या कंपनीमध्ये २४ तास पाणीपुरवठा होईल इतक्या साठवण टाक्या बांधलेल्या असतात. तसेच २ दिवस कारखान्यांचे उत्पादन बंद झाल्याबाबत महामंडळाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) तारापूर औद्योगिक क्षेत्र सन १९७२ साली विकसित करण्यात आले आहे. सदर क्षेत्राच्या जमिनीखालून जलवाहिन्या, अनेक प्रकारच्या सेवा वाहिन्या, विविध केबल्स् इ.चे जाळे गेलेले आहे. त्यांचे निश्चित स्थान कळत नसल्यामुळे नविन सेवा टाकताना जेसीबी यंत्राव्दारे खोदकाम केल्यास जास्त नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे मे.गुजरात गॅस लि. यांनी ड्रिलींगव्दारे काम हाती घेतले आहे. अशी घटना गेल्या ६ महिन्यात दोन वेळा घडलेली असून दुरूस्तीचे काम तातडीने पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे त्या परिसरातील उद्योजकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(४) मे.गुजरात गॅस लि. यांनी महामंडळाच्या जमिनीखालील असलेल्या जलवाहिन्या तसेच अनेक प्रकारच्या सेवा वाहिन्या, केबल यांची कामे जेसीबी यंत्राव्दारे खोदकाम न करता, ड्रिलींगव्दारे कामे करण्यात येत आहे. तसेच सदर खोदकाम करतांना होणाऱ्या नुकसानीची भरपाई दुरुस्ती करण्याची जबाबदारी ही मे.गुजरात गॅस लि. कंपनी यांची आहे व तसा करारनामा देखील करण्यात आलेला आहे. तसेच मे.गुजरात गॅस लि. कंपनी यांनी कामात सुसूत्रता आणून पुन्हा असे प्रकार घडणार नाही याची काळजी घेवून व त्याची खात्री महामंडळास देईपर्यंत त्यांची कामे बंद ठेवण्याबाबत मे.गुजरात गॅस लि. यांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहांना दिलेल्या अनुदानात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(८) * ४६९५४ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिकेत तटकरे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.आनंदराव पाटील, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.निलय नाईक, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित जातीच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने मान्यता दिलेल्या वसतिगृहांचे अनुदान रोखण्याचे आदेश सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी सन २०१६ मध्ये दिले असून अशा समितीबाबत निर्णय घेण्याचे व वसतिगृहांना मान्यता देण्याचे अधिकार सामाजिक न्याय राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या कांबळे समितीला देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जातीच्या शालेय विद्यार्थ्यासाठी असलेल्या खाजगी पण शासकीय अनुदानित ८५० वसतिगृहांना परवानगी नसताना वसतिगृहात वर्षानुवर्षे बोगस विद्यार्थी हजेरीपटावर दाखवून कोटयवधींचे अनुदान देण्यात आल्याचे दिनांक ३ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसतिगृहे बंद करण्याऐवजी शासनाची मंजुरी नसताना कांबळे समितीने कोणत्या निकषानुसार ८५० वसतिगृहांना मान्यता दिली तसेच वसतिगृहांना केलेल्या कोटयवधीचे अनुदान वाटप प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) राज्यातील काही वसतिगृहांकडे मूळ मान्यता आदेश नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे या वसतिगृहाची तपासणी होईपर्यंत वसतिगृहाचे अनुदान थांबविण्यात आले होते. त्यानुषंगाने सदर वसतिगृहाच्या तपासणी करीता मा.राज्यमंत्री (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०१/०९/२०१७ च्या आदेशान्वये समिती गठीत करण्यात आली होती.

(२) नाही.

(३) या वसतिगृहाच्या दस्तऐवजाच्या तपासणीमध्ये नियमाप्रमाणे असल्याचे निदर्शनास आलेल्या ७९८ वसतिगृहाचे अनुदान वितरणाचे आदेश समितीच्या मान्यतेने आयुक्त, समाजकल्याण पुणे यांनी निर्गमित केले आहेत. सदर वसतिगृहे नियमानुसार असल्याचे आढळून आल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाणार (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे उभारण्यात येणाऱ्या तेलशुध्दीकरण प्रकल्पाबाबत

**(९) * ४६६२५ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ४१९४६ ला दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाणार (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे उभारला जाणारा कोटयवधी रुपये खर्चाचा तेल शुध्दीकरण प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय दिनांक २ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या प्रकल्पाची अधिसूचना पुन्हा तेथेच काढण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने एकात्मिक औदयोगिक वसाहतीसाठी रायगड येथे संपादित केलेल्या जमिनीवर हा प्रकल्प उभारण्याचा शासनाचा विचार आहे, यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) राजापूर औद्योगिक क्षेत्रासाठी अधिसूचित करण्यात आलेली १४ गावातील खाजगी ५४५३.७४५ व ७.७२० सरकारी असे एकूण ५४६१.४६५ हे.आर व क्रुड टर्मिनलसाठी अधिसूचित करण्यात आलेली २ गावातील एकूण ४०५.५५९ हे.आर असे संपूर्ण क्षेत्र दिनांक ०२/०३/२०१९ रोजीच्या अधिसूचनेद्वारे विनाअधिसूचित करण्यात आले असून, त्यानुषंगाने महसूली अभिलेखात आवश्यक त्या सुधारणा करण्याची कार्यवाही तातडीने करण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना दिनांक ०७/०३/२०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे. त्यामुळे पुन्हा तेथेच प्रकल्पासाठी क्षेत्र अधिसूचित करण्याची अधिसूचना काढण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

(४) रायगड जिल्ह्यात तेल शुध्दीकरण प्रकल्पासाठी भूसंपादन करण्याचा प्रस्ताव उद्योग विभागाच्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१०) * ४७६८६ श्री.बाळाराम पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांचे वन हक्काचे दावे मा.न्यायालयाने नाकारलेल्या कुटूंबांची जमीन काढून घेण्याचे आदेश दिल्याने राज्यातील १ लाख ७५ हजार आदिवासी कुटुंबे बेघर होत असल्याचे दिनांक २३ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी अधिनियम (वनहक्क कायदा) २००६ हा कायदा आदिवासी व जंगलावर आधारित जनसमुहाकरीता सुरक्षित ठेवलेल्या वनांचा हक्क देणारा असून, सदर कायदयान्वये शासनाने वन समित्या स्थापन केल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वनहक्काच्या दाव्यांची संख्या ३ लाख ७२ हजार २७८ इतकी असून त्यातील मान्य दावे १ लाख ६३ हजार ५३८ तर प्रलंबित दावे २ लाख ८ हजार ७४० इतके असून यातील मंजूर वनक्षेत्र ३ लाख ६४ हजार १०५ चौ. मीटर इतके आहे म्हणजे एका वनहक्क दावेदाराला सरासरी २.२२ चौ.मी. इतकेच क्षेत्र अधिकार अभिलेखात वाटप झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवासींनी आपल्या मागण्यांसाठी व वनहक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी श्रमजीवी संघटनेमार्फत अनेक आंदोलने केली असून माहे मार्च, २०१८ मध्ये नाशिक येथे शेतकऱ्यांनी मोर्चा काढून वनहक्काची अंमलबजावणी करण्याबाबत मागणी केली असता मा.मुख्यमंत्र्यांनी सहा महिन्यात दावे निकाली काढण्याचे आश्वासन दिले,

परंतु आश्वासनाची पूर्तता न झाल्याने पुन्हा माहे एप्रिल, २०१८ मध्ये याच मुद्दयावर श्रमजीवीने मोर्चाचे आयोजन केले असता मा.मुख्यमंत्र्यांनी शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलावून पुन्हा नव्याने आश्वासन दिले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके** : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

अनुसूचित जमाती व पांरपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ नियम २००८ व सुधारित नियम २०१२ अंतर्गत मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली "राज्यस्तरीय सनियंत्रण समिती" स्थापन करण्यात आली आहे. तर जिल्हास्तरावर २६ जिल्हास्तरीय वनहक्क समित्या, उपविभाग स्तरावर ९४ उपविभागीय स्तरीय वनहक्क समित्या तसेच ग्रामसभा स्तरावर १५००२ ग्रामस्तरीय वनहक्क समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत दिनांक ३१ मे, २०१९ अखेरपर्यंत ३,६३,२४४ इतके वैयक्तिक वनहक्क दावे ग्रामसभेकडे प्राप्त झाले आहेत. त्यापैकी एकूण १,८२,९६९ इतके दावे व अपिले जिल्हास्तरीय समितीने अंतिमरित्या मान्य केले असून त्याकरीता एकूण ४,१६,३७१ एकर इतके वनक्षेत्र मंजूर केलेले आहे.

(४) श्रमजीवी संघटनेचे संस्थापक श्री.विवेक पंडीत व संघटनेचे पदाधिकारी यांचे समवेत दिनांक १७ मार्च, २०१८ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा शासकीय निवासस्थान, मलबार हिल, मुंबई येथे "आदिवासींच्या विविध प्रश्नांबाबत" बैठक संपन्न झाली. प्रस्तुत बैठकीमध्ये दिलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी बैठकीचे इतिवृत्त संबंधित प्रशासकीय विभाग/क्षेत्रिय अधिकारी यांचेकडे दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी पाठविण्यात आलेले आहे.

(५) प्रलंबित वनहक्क दावे व अपिले यांचा निपटारा करण्याच्या अनुषंगाने दिनांक ११ मे, २०१८ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये विशेष “वनमित्र मोहिम” राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यासाठी पालघर जिल्ह्यासाठी रुपये १०.०० लक्ष व ठाणे जिल्ह्यासाठी रुपये १५.०० लक्ष इतका निधी शासनामार्फत उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यानुसार पालघर व ठाणे जिल्हाधिकारी यांनी अनुक्रमे १० व ०६ कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक केली असून त्यांच्यामार्फत वनहक्क दाव्यांच्या निपटारा करण्यात येत आहे.

-----------------

## आदिवासी क्षेत्रातील अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शासकीय आश्रमशाळेप्रमाणे योजनेचा लाभ देणेबाबत

**(११) * ४७४३५ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी भागात खाजगी व्यवस्थापनाच्या माध्यमातून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा चालविल्या जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदिवासी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या आदिवासी शाळा मधील मुलांना ज्या विविध योजनांचा लाभ मिळत आहेत त्या योजनांचा लाभ याच भागातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील मुलांना दिला जात नसुन या मुलांनाही विविध योजनांचा लाभ देण्याची मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या मुलांनाही विविध योजनांचा लाभ देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व सुविधा दिल्या जातात. अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आहारासाठी शासनाकडून प्रति विद्यार्थी प्रति महिना रुपये १५००/- प्रमाणे परिरक्षण अनुदान मंजूर करण्यात येते. तसेच विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या-पुस्तके, अंथरुण-पांघरुण, ताट-वाटी, ग्लास, आंघोळीचे साबण, कपडे धुण्याचे साबण, टुथपेस्ट इ. साहित्यासाठी आकस्मिक अनुदान मंजूर करण्यात येते. तसेच शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रकल्पस्तराकडून तसेच शाळास्तरावरुन विविध उपक्रम राबविले जातात. इयत्ता १० वी आणि १२ वी मध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना विभागामार्फत पारितोषिक दिले जाते. संस्थामार्फत विद्यार्थ्यांना वैद्यकीय सुविधा पुरविल्या जातात. अनुदानित आश्रमशाळेमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा दुर्देवाने मृत्यू झाल्यास एकूण रुपये २.०० लक्ष सानुग्रह अनुदान विद्यार्थ्यांच्या पालकांना अदा करण्यात येते. अशा प्रकारे अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शासकीय शाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्व सोयी-सुविधा व योजनांचा लाभ देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## अपंग कल्याण आयुक्तालयात कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याबाबत

**(१२) * ४७९०४ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नव्या कायद्यानुसार दिव्यांगांच्या प्रवर्गाची संख्या ६ वरून २१ इतकी झाली असल्यामुळे दिव्यांगांच्या संख्येत वाढ होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपंग कल्याण आयुक्तालयात मनुष्यबळाची गरज भासत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्तालय व संचालनालय अशी आयुक्तालयाची व्दिस्तरीय रचना करून ५२१ पदांना मंजुरी द्यावी अशी मागणी अपंग कल्याण आयुक्तालयाने सामाजिक न्याय विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीवर कोणता निर्णय घेतला, त्याचे स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे. अपंग कल्याण आयुक्तालयाच्या कामकाजाची व्याप्ती वाढणार असल्याने आयुक्तालयाचे बळकटीकरण करण्याकरीता ४३० नियमित व ७२ बाहयस्त्रोताव्दारे अशा एकूण ५०२ पदांचा आकृतिबंधाचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.
(४) कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील दलित वस्त्यांची निवड प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(१३) * ४७५७९ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयातील पाच दलित वस्त्यांची निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दलित वस्त्यांची निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात न आल्यामुळे जिल्हयात वस्त्यांसाठी सिमेंट रस्ते, पेव्हर ब्लॉक रस्ते, नाली बांधकाम, पथदिवे इत्यादी कामांसाठी शासनाकडे येणारा निधी मिळणार नसल्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दलित वस्त्यांमधील विकासाची कामे करण्यासाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून दलित वस्ती निवड प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे ही खरे नाही.
(३) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे या योजनेंतर्गत सन २०१७-१८ या वर्षातील कामांची निवड प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. तसेच सन २०१८-१९ या वर्षातील कामांची निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य सहकारी बँकेची रक्कम शासनाकडे थकीत असल्याबाबत

**(१४) * ४६८०० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सहकारी बँकेचे १३०० कोटी रुपये शासनाकडे थकीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या थकहमीच्या कर्जाचा परतावा झालेला नसतानाही शासनाने नव्याने २००० कोटी रुपयांच्या कर्जाला थकबाकी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बँकेचे थकीत कर्ज वसूल करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे. शासनाने विविध सहकारी संस्थांना दिलेल्या सन १९८४-८५ ते सन २०१०-११ या कालावधीत थकहमीपोटी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने रुपये २२३८.२० कोटी रकमेची मागणी केली. राज्य बँकेने याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यावरील सुनावणीदरम्यान मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २९/०३/२०१९ च्या आदेशान्वये रुपये १०४९.४१ कोटी राज्य बँकेस देण्याचे आदेश पारित केले आहेत. यापैकी रुपये १०० कोटी बँकेस अदा करण्यात आले असून उर्वरित रुपये ९४९.४१ चार हप्त्यात देणेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १०/०५/२०१९ रोजी आदेश दिले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) शासन हमीवर बँकांनी दिलेल्या कर्जाची वसुली करण्याची प्राथमिक जबाबदारी ही संबंधित बँकांची असते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ जयंती वर्षानिमित्त निवडक वस्त्यांच्या सर्वांगीण विकास कामाबाबत

**(१५) * ४७८०० श्री.अनिकेत तटकरे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ जयंती वर्षानिमित्त निवडक अनुसूचित जाती व नवबौध्द वस्त्यांच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाने निवडलेल्या गावातील अनेक प्रस्ताव मंजुरीसाठी शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहा व तळा (जि.रायगड) येथील प्रस्तावही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळा शहरांतर्गत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील प्रलंबित प्रस्ताव त्वरीत मंजूर होणेविषयी शासन विशिष्ट मोहिम हाती घेणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे ही खरे नाही.

(३) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तारापुर (जि.पालघर) येथील स्वेअर केमिकल व आरती ड्रग्ज कंपनीत वायुगळती झाल्याबाबत

**(१६) * ४८२३१ श्री.रविंद्र फाटक, ॲड.अनिल परब, श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर औद्योगिक क्षेत्र (जि.पालघर) येथील स्वेअर केमिकल कंपनीमध्ये रासायनिक प्रक्रिया करतांना झालेल्या वायुगळतीमध्ये तीन कामगारांचा मृत्यू झाल्याची घटना घडली असतानाच तारापुरच्या आरती ड्रग्ज कंपनीत दिनांक १४ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास वायुगळती झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरती ड्रग्ज कंपनीत झालेल्या वायुगळतीची बाधा चार महिला कर्मचाऱ्यांना झाल्याने त्यांना बोईसर येथील विकास रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सदरहू वायुगळती घटनेमध्ये तीस कामगारांना गंभीर इजा झाली असताना यासंदर्भातील अहवालात फक्त सात जणांना बाधा झाल्याचे नमुद करुन शासनाची दिशाभूल करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीत वापरण्यात येणाऱ्या रसायनांची माहिती कंपनीबाहेर फलकावर ठळकपणे प्रकाशित करणे बंधनकारक असताना अपघातग्रस्त कंपनीच्या बाहेर दिसून आले नाही तसेच खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी आजूबाजूचे कारखाने रिकामे केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुरक्षेच्या नियमाकडे दुर्लक्ष करुन उत्पादन घेणाऱ्या तारापूर औद्योगिक कंपन्यांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार कंपन्यांविरुध्द कारवाई करुन संबंधित मृत कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय कुटे :** (१) होय, हे खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक क्षेत्रातील मे.स्क्वेअर केमिकल्स, प्लॉट नं.एन-६० या कारखान्यात दिनांक १२/०५/२०१९ रोजी दुपारी ३.२० वाजण्याच्या सुमारास रिॲक्टरमध्ये रासायनिक प्रक्रिया केलेले मटेरियल हे थायोनिल क्लोराईडच्या रिकाम्या ड्रममध्ये भरत असताना ड्राय हायड्रोक्लोरीक ॲसिड व सल्फर डाय ऑक्साईड हे विषारी वायु तयार होऊन त्याची बाधा तीन कामगारांना होऊन त्यांचा मृत्यू झाला. तसेच दिनांक १४/०५/२०१९ रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास मे.आरती ड्रग्ज लिमिटेड, प्लॉट नं.ई-१०४,१०५,१०६,११९,१२०, या कारखान्यात बाहेरुन आणलेल्या अमोनिया सिलेंडरला छिद्र पडल्याने त्यातून अमोनिया वायुची गळती होऊन त्याची बाधा चार महिला कामगारांना झाली.

(२) सदर दोन्ही कारखान्यांत झालेल्या दुर्घटनेत ३० कामगारांना गंभीर इजा झाली हे म्हणणे खरे नाही.

मे.स्क्वेअर केमिकल्स, प्लॉट नं.एन-६० या कारखान्यात दिनांक १२/०५/२०१९ रोजी दुपारी ३.२० वाजण्याच्या सुमारास झालेल्या वायुगळतीत तीन कामगारांचा मृत्यू झाला आणि दोन कामगारांना वायुची बाधा झाल्यावर त्यांना रुग्णालयात दाखल करुन उपचारानंतर दिनांक १३/०५/२०१९ रोजी घरी सोडण्यात आले.

तसेच मे.आरती ड्रग्ज लिमिटेड, प्लॉट नं.ई-१०४,१०५, १०६,११९, १२० या कारखान्यात दिनांक १४/०५/२०१९ रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास झालेल्या वायुगळतीची बाधा ४ महिला कामगारांना झाल्यावर त्यांना रुग्णालयात दाखल करुन उपचारानंतर त्याचदिवशी सायंकाळी ६.०० वाजता घरी सोडण्यात आले.

(३) होय, हे खरे आहे.

सदर कारखान्यांनी वापरण्यात येणाऱ्या घातक रसायनांची माहिती कंपनीबाहेरील माहिती फलकाव्दारे दिलेली नाही. मे. आरती ड्रग्ज लि. प्लॉट क्र. ई-१०४, १०५, १०६, ११९ व १२० म. औ. वि. महामंडळ, तारापूर या कारखान्यात झालेल्या वायुगळती गंभीर नसल्यामुळे पोलीसांनी आजूबाजूचे कारखाने रिकामी केले नव्हते. मे. स्क्वेअर केमिकल्स, प्लॉट क्र. एन-६०, म. औ. वि. महामंडळ, तारापूर या कारखान्यात झालेल्या वायुगळतीमुळे पोलिसांनी खबरदारी म्हणून आसपासचे दोन कारखाने रिकामी केले होते.

(४) मे. स्क्वेअर केमिकल्स प्लॉट नं.एन-६० या कारखान्यात झालेल्या वायुगळतीची चौकशी दिनांक १२/०५/२०१९ रोजी करण्यात आली असून चौकशीत आढळून आलेल्या कारखाने अधिनियम,१९४८ च्या कलम ७-A(२)(a) व कारखाने नियम, १९६३ च्या नियम ४(२), ४(४), ४(१)(d) व ७३-N(२) च्या भंगाकरीता कारखान्याचे भोगवटादारा विरुध्द मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात ०२ फौजदारी खटले दाखल करण्यात आले. पोलीस विभागाने भोगवटादाराविरुध्द भा.दं.वि. कलम ३०४A, ३३७, २८४ या खाली गुन्हा क्रमांक १२५/२०१९ नोंद केलेला आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे सदर कारखाना व्यवस्थापनाला कारणे दाखवा नोटीस बजावुन उत्पादन बंदचे आदेश देण्यात आलेले आहेत.

मे.आरती ड्रग्ज लिमिटेड, प्लॉट नं.ई-१०४,१०५, १०६,११९, १२० या कारखान्यात झालेल्या वायुगळतीची चौकशी दिनांक १४/०५/२०१९ रोजी करण्यात आली असून चौकशीत आढळून आलेल्या महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ च्या नियम ४(२), ४(४) च्या भंगाकरीता एक फौजदारी खटला दिनांक २१/०६/२०१९ रोजी मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात दाखल करण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र कारखाने नियम,१९६३ च्या नियम ११५(१),११५(२) च्या भंगाकरीता व्यवस्थापकांविरुध्द एक फौजदारी खटला दिनांक २१/०६/२०१९ रोजी मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात दाखल करण्यात आलेला आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे कारखाना का बंद करण्यात येऊ नये याबाबत कारणे दाखवा नोटीस पाठविली आहे.

या घटनेमध्ये मृत पावलेल्या प्रभाकर खडसे यांचे वारसांना रु १०,००,०००/-, दत्तात्रय घुले यांचे वारसांना रुपये ५,००,०००/- व रघुनाथ गोराई यांचे वारसांना रुपये ५,००,०००/- इतके सानुग्रह अनुदान व्यवस्थापनाने दिलेले आहे. तसेच नुकसान भरपाई आयुक्त, ठाणे यांचेकडे प्रभाकर खडसे यांचे वारसांना देण्याकरीता रु ४,८४, २००/-, दत्तात्रय घुले यांचे वारसांना देण्याकरीता रुपये ८, ७३, ८८०/-, रघुनाथ गोराई यांचे वारसांना देण्याकरीता रुपये ४, २६, ०८०/- इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून जमा करण्यात आलेली आहे.

(५) औद्योगिक सुरक्षा व आरोग्य् संचालनालयाकडून दिनांक १२/०५/२०१९ रोजी मे. स्क्वेअर केमिकल्स प्लॉट नं.एन-६० या कारखान्यात झालेल्या वायुगळतीची चौकशी दिनांक १२/०५/२०१९ रोजीच करण्यात आली असून भोगवटादाविरुध्द फौजदारी खटले दाखल केले आहेत. तसेच दिनांक १४/०५/२०१९ रोजी मे.आरती ड्रग्ज लिमिटेड, प्लॉट नं.ई-१०४,१०५, १०६,११९, १२० या कारखान्यात झालेल्या वायुगळतीची चौकशी दिनांक १४/०५/२०१९ रोजीच करण्यात आलेली आहे. त्यामुळे चौकशी तसेच कार्यवाही या बाबत कोणताही विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यातील फासे पारधी समाजाच्या मागण्यांबाबत

**(१७) * ४८२८४ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी फासे पारधी समाजाच्या लोकांनी त्यांच्या मागण्यांसाठी नागपूर येथे विभागीय आयुक्त कार्यालयावर दिनांक ९ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढून त्यांचे निवेदन विभागीय आयुक्तांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी फासे पारधी समाजाच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या मागण्यांवर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे नाही. श्री.दादाजी आदिवासी फासे पारधी समाज संघटनेने त्यांचे निवेदन विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे दिले नसून दिनांक ०८/०३/२०१९ रोजी मोर्चा काढून विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे दिले आहे.

(२) प्रत्येक फासे पारधी कुटुंबातील एका व्यक्तीस किमान ४ एकर ई-क्लासची शेत जमीन किंवा वन जमीन देणे, शैक्षणिक पात्रतेच्या आधारावर शासकीय नोकरी देणे, फासे पारधी तरुणांवर पोलीस खात्यात तसेच भारतीय सैन्यात नोकरी देणे, फासे पारधी जमातीला आदिम जातीचा दर्जा बहाल करणे, फासे पारधी बेड्याला महसूली गावाचा दर्जा देणे, व्यवसायासाठी रुपये १.०० लाख शासकीय अनुदान देणे, व्यवसाय, स्वयंरोजगाराकरीता कर्ज उपलब्ध करुन देणे, जिल्हास्तरावर फासे पारधी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे, मुद्रा योजनेंतर्गत रुपये ५०,०००/- मुद्रा कर्ज उपलब्ध करुन देणे, फासे पारधी समाजाच्या निर्दोष व्यक्तींचा पोलिसांकडून शारिरीक व मानसिक छळ होत असल्याबाबत, फासे पारधी बेड्यावर कॅम्प लावून जात वैधता प्रमाणपत्र वितरीत करणे, फासे पारधी बेड्यामध्ये अनेक वर्षापासून वास्तव्य करीत असलेल्यांच्या नावाने गाव नमूना ८ करण्यात यावा व त्यांना घरकुल बांधून देण्यात यावे, फासे पारधी समाजाच्या मुलांकरीता शासकीय आश्रमशाळा सुरु करण्यात यावी, फासे पारधी समाजाच्या प्रत्येक बचत गटाला कुक्कुटपालन तसेच शेळीपालन व्यवसाय सुरू करण्याकरीता रुपये १५.०० लाख अनुदान उपलब्ध करुन देण्यात यावे, फासे पारधी समाजाच्या बचत गटांना नोंदणीकृत संस्थेच्या नावाने स्वस्त धान्य दुकान देण्यात यावे, इत्यादी मागण्या त्यांनी केल्या आहेत.

(३) वरील मागण्यांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत शासन पत्र दिनांक ०३/०४/२०१९ अन्वये संबंधित विभाग व कार्यालयांना कळविले आहे. तसेच संघटनेच्या मागण्यांच्या अनुषंगाने दिनांक १४/०६/२०१९ रोजी मा.मंत्री (वित्त आणि नियोजन, वने) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागांतर्गत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्याबाबत

**(१८) * ४८३६१ श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागांतर्गत सन २०१८-१९ वर्षात राबविल्या जाणाऱ्या मॅट्रिकेत्तर शिष्यवृत्ती योजनेचे नागपूर जिल्हयातील ८२९८ विद्यार्थ्यांच्या अर्जापैकी केवळ २८६ अर्ज मंजूर होवूनही एकाही विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती मिळाली नसल्याचे दिनांक १७ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६ ते २०१८-१९ पर्यंत जिल्हयातील ४२ हजार विद्यार्थ्यांचे अर्ज सामाजिक न्याय विभागाकडे प्रलंबित असल्याने जिल्हयातील मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही, महाडिबीटी पोर्टल माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये सुरु करण्यात आले असून, दिनांक १४.१२.२०१८ रोजी एकूण ८३१ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे रुपये १ कोटी ५७ लाख ३२ हजार ४२८ इतक्या रक्कमेचे देयक काढण्यात आले होते. त्यामधील नागपूर जिल्हयातील एकूण ६१ विद्यार्थ्यांचा समावेश होता.

(२) नाही, नागपूर जिल्हयातील सन २०१५-१६ ते २०१८-१९ या कालावधीत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालय स्तरावर ३७९२५ व जिल्हा स्तरावर ४१८६ इतके अर्ज प्रलंबित होते. त्यापैकी, माहे जून, २०१९ अखेर २७१२९ इतके अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

सद्य:स्थितीत, महाविद्यालयस्तरावर १३३२८ व जिल्हास्तरावर १६५४ अर्ज प्रलंबित आहेत.

(३) सदरील प्रलंबित अर्जांची त्रुटीपूर्तता करणे अर्ज त्वरेने निकाली काढण्याबाबत सूचना वेळोवेळी आयुक्तालयामार्फत देण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सहायक आयुक्तांकडून योग्य तो पत्रव्यवहार करुन कार्यशाळा आयोजित करण्याच्या व आवश्यकता

वाटल्यास कॅम्प घेवून सदर कालावधीतील पात्र अर्जांना मंजूरी देवून ऑफलाईन पध्दतीने शिष्यवृत्ती वितरीत करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंबेजोगाई (जि.बीड) येथे हरभरा व तूर खरेदीत कोट्यवधीचा अपहार झाल्याबाबत

**(१९) * ४८४३२ श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबेजोगाई (जि.बीड) येथे पणन महासंघामार्फत दिनांक १ मार्च, २०१८ ते १३ जून, २०१८ या कालावधीत हरभरा व तूर खरेदी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खरेदीची व्यापकता लक्षात घेता बाजार समित्यांना सब एजन्ट नेमण्याची परवानगी दिली असता सब एजन्ट शितल कृषी निविष्ठा सहकारी संस्थेच्या केंद्रावर विहित मुदतीत १ लाख २२ हजार १४५ क्विंटल हरभरा खरेदी करण्यात आला असून खरेदीपैकी ५ हजार २२१ क्विंटल हरभरा जमा करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या हरभऱ्याची रक्कम रुपये २ कोटी २९ लाख एवढी असून या प्रकरणी शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी पणन महासंघाचे विभागीय अधिकारी यांनी अंबेजोगाई पोलिसांत गुन्हा नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) आधारभूत दराने नाफेडमार्फत खरेदी करण्यासाठी पणन महासंघाच्यावतीने खरेदी विक्री संघाकडून खरेदी केली जाते. यासाठी पणन महासंघाकडून खरेदी केंद्रनिहाय सबएजन्ट संस्थांची नियुक्ती केली जाते.

हंगाम २०१७-१८ मधील तूर व हरभरा खरेदीसाठी अंबेजोगाई, बीड येथील खरेदी केंद्रावर शीतल कृषी निविष्ठा सहकारी संस्था या संस्थेची नियुक्ती केली होती. सदर संस्थेने खरेदी केलेला माल पुढीलप्रमाणे आहे :-

| पिकाचे प्रकार | खरेदी क्विंटल | वखार महामंडळात साठवणूक केलेला माल (क्विं.) |
|---|---|---|
| तूर | २५५५०.३१ | २६२३०.०० |
| हरभरा | १२२१४५.६० | ११६४७४.२६ |

(३) संस्थेने खरेदी केलेला संपूर्ण माल वखार महामंडळाच्या गोदामात जमा केलेला नाही यासाठी पणन महासंघाने संबंधित संस्थेविरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे. यासंदर्भात पोलीस चौकशी सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हा सहकारी बँकेमधील रिक्त पदाच्या भरतीबाबत

**(२०) * ४८४५२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा सहकारी बँकेमध्ये लिपिक पदाच्या १३३ व शिपाई पदाच्या १४ अशा एकूण १४७ जागांसाठी ऑनलाईन पध्दतीने भरती प्रक्रिया राबविण्यात आल्याचे दिनांक १ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ऑनलाईन भरती प्रक्रिया राबविण्याबाबत अमरावती येथील खाजगी कंपनीला कंत्राट देण्यात आले असूनही एजन्सी सहकार विभाग, मंत्रालय प्रशासनाकडून निश्चित करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बँकेच्या संचालकांनी उमेदवार भरतीचा कोटा ठरवून प्रति उमेदवार रुपये २५ लाख रोख रक्कम स्विकारुन गैरव्यवहार केल्याबाबत सहकार आयुक्त, पुणे व प्रधान सचिव, सहकार विभाग यांचेकडे परिक्षार्थी उमेदवारांनी त्याच सुमारास तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय.

यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कनिष्ठ लिपिक १३३ व शिपाई १४ अशा एकूण १४७ पदांची ऑनलाईन भरती करण्यासाठी दिनांक ०८/०३/२०१९ रोजी वृत्तपत्रातुन जाहिरात प्रसिध्द केलेली आहे.
(२) नाही.

सहकार आयुक्त कार्यालयाने दिनांक ११/०३/२०१९ रोजीच्या पत्रान्वये यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस SLTF च्या दिनांक २०/०४/२०१६ रोजीच्या अहवालानुसार व दिनांक १५/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार नोकरभरतीस पात्र एजन्सी नियुक्तीबाबत व यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची नोकरभरती प्रक्रिया ऑनलाईन राबविणेबाबत बँकेच्या स्तरावरून उचित कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.
(३) व (४) अशा स्वरुपाची तक्रार श्री.शैलेश शेंडे, रा.वडगाव, जि.यवतमाळ यांनी मा.राज्यपाल यांचेकडे दिनांक १६/०४/२०१९ रोजीच्या पत्रान्वये केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांना दिनांक १२/०६/२०१९ रोजी चौकशी करून त्याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळोजा (नवी मुंबई) औद्योगिक वसाहतीतील आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(२१) * ४८५८३ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (नवी मुंबई) औद्योगिक वसाहतीतील आगीच्या घटनांमध्ये मागील दोन-तीन वर्षात वाढ होत असल्याने अग्निशमन यंत्रणा अपुरी पडत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१९ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कारखाना सुरू झाल्यानंतर दरवर्षी फायर ऑडिट करून घेणे बंधनकारक असतानाही करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत तळोजा औद्योगिक वसाहतीत सुसज्ज असे अग्निशमन केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहे व त्यामध्ये आग आटोक्यात आणण्याकरीता १ वॉटर टेंडर, १ फोम टेंडर व १ वॉटर बाऊझर ही वाहने सुसज्ज ठेवण्यात आली आहेत. तसेच एखादी आगी संदर्भात मोठी दुर्घटना घडल्यास अतिरिक्त अंबरनाथ, टि.टि.सी. “डी”ब्लॉक, टि.टि.सी. “आर” ब्लॉक, तसेच पनवेल व सिडको या जवळपास असलेल्या अग्निशमन केंद्रांची मदत घेतली जाते. त्यामुळे सदर औद्योगिक क्षेत्रात अग्निशमन यंत्रणा अपुरी पडत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२) व (३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ नुसार कारखान्यांना दरवर्षी फायर ऑडीट करणे बंधनकारक नाही. तथापि, कारखान्यात बसविण्यात आलेली अग्निशमन

यंत्रणा सुस्थितीत असल्या संबंधीचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र दरवर्षी माहे जानेवारी व जुलै महिन्यात सक्षम प्राधिकाऱ्यांकडून घेऊन ते नजीकच्या अग्निशमन केंद्रात सादर करणे बंधनकारक केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गटई कामगारांचे अर्ज संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळात प्रलंबित असल्याबाबत

**(२२) * ४८७३९ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यासह शहरात दोन हजारांवर गटई कामगारांची नोंदणी असून त्यांना शेड मिळत नसल्याने ऊन-पावसात छत्रीखाली घाम गाळत काम करावे लागत असल्याने उपराजधानीसारख्या शहरात २० वर्षात अवघ्या २५० गटई कामगारांना योजनेचा लाभ मिळाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१५ ते २०१७ या दोन वर्षात १३९ प्रकरणे मुंबईतील संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या मुख्य कार्यालयात प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गटई कामगारांना शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे पत्र्याचे स्टॉल वाटप करण्याची योजना १९९७ पासून कार्यान्वित केली असून योजनेंतर्गत गटई कामगारांना शंभर टक्के अनुदान तत्वावर पत्र्याचे स्टॉल व रूपये ५०० रोख अनुदान देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजकुमार बडोले :** (१) व (२) हे खरे नाही.

सन २००७-०८ ते सन २०१५-१६ पर्यंत प्राप्त झालेल्या ६३७ लाभार्थ्यांच्या यादीपैकी एकूण ६२९ पात्र लाभार्थ्यांना गटई स्टॉलचे वाटप करण्यात आलेले आहे.

तर सन २०१६-१७ नंतर प्राप्त झालेल्या १२७ पात्र लाभार्थ्यांना गटई स्टॉलचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक क्षेत्राकरीता संपादित केलेल्या जमिनीचा वापर करण्याबाबत

**(२३) * ४८८१७ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक क्षेत्राकरीता संपादित केलेल्या जमिनीचा वापर न झाल्यामुळे सदर जमीन मूळ मालकांना / वारसांना परत मिळणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.उद्योग मंत्री यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने काही निर्णय घेतला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे बिरवाडी, आमशेत, काळींज येथील जमिनी संपादीत करण्यात आलेल्या आहेत. श्री.विठ्ठल रामचंद्र महामुणकर यांचे १० गटांचे एकूण क्षेत्र ३.६३.४ हे.आर. होते. त्यापैकी महामंडळाने ७ गटाचे २.६९.३ हे.आर. इतके क्षेत्र प्रत्यक्ष ताब्यात घेतले आहे. त्यापैकी १.५४.२ हे.आर हे वन खात्यास व रस्त्याकरीता हस्तांतरीत केले आहे तर १.१५.१ हे.आर. क्षेत्रावर भूखंडाचे आरेखन केले आहे. उर्वरीत ३ गटांचे ०.९४.१ हे.आर. क्षेत्रासह एकूण ७४.२८.८ हे.आर इतके क्षेत्र विनाअधिसुचित करण्यासाठी महामंडळाने प्रस्ताव सादर केला असून त्यावर कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळणे मायनिंग (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथे पोकलॅन मशीन कोसळून अपघात झाल्याबाबत

**(२४) * ४९०५८ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळणे मायनिंग (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) उगाडे येथील वन जमिनीच्या लगत उत्खनन करताना पोकलॅन मशीन कोसळून झालेल्या अपघातात एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असून बरेच कर्मचारी मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जखमी झालेल्या कर्मचाऱ्यांना तसेच मृत्यूमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना कोणत्या प्रकारची मदत करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) कळणे मायनिंग (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथे दिनांक २४ एप्रिल, २०१९ रोजी उत्खनन करताना पोकलॅन मशीन कोसळून झालेल्या अपघातात एका कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला आहे.

तथापि, बरेच कर्मचारी मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले हे खरे नाही.

(२) मृत्यूमुखी पडलेल्या कर्मचाऱ्याच्या नातेवाईकांना अंत्यविधी व इतर सोपस्कार करण्याकरीता कंपनीने तातडीने रुपये १ लाखाची मदत केली आहे. तसेच प्रशासकीय चौकशीअंती देय ठरणारी नुकसान भरपाईची रक्कम मयत व्यक्तीच्या कुटुंबियांना कंपनीमार्फत देण्यात येणार आहे.

(३) खाण सुरक्षा निदेशालय, प्रादेशिक क्षेत्र गोवा, भारत सरकार यांचे मार्फत चौकशी करण्यात येत आहे. तसेच पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, दोडामार्ग येथे कंपनीचे व्यवस्थापक यांचेविरुध्द दोडामार्ग पोलीस ठाणे येथे गु.नं. ०२/२०१९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## टाटा पॉवर कंपनीचे देयक प्रलंबित असल्याबाबत

**(२५) * ४९०७१ श्री.विलास पोतनीस, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहराला वीज पुरवठा करणाऱ्या बेस्ट उपक्रमाचे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे राज्य शासनाकडे २० कोटी रुपये थकीत असल्याचे दिनांक २७ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच टाटा पॉवर कंपनीने मुंबईतील बेस्ट उपक्रमास दिनांक १४ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास नोटीस पाठवून माहे डिसेंबर, २०१८ ते एप्रिल, २०१९ या कालावधीतील रुपये ५६१.५८ कोटींचे थकीत देयक न भरल्यास दिनांक २१ मे, २०१९ पासून वीज पुरवठा खंडित करण्याचा इशारा दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, टाटा पॉवर कंपनीने दिलेल्या इशाऱ्यामुळे मुंबईकरांवर वीज खंडित होण्याचे निर्माण झालेले संकट दूर करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, टाटा पॉवर कंपनीचे थकीत देयक बेस्ट उपक्रमाने भरले, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) बेस्टतर्फे दरमहा वीज देयक विविध कार्यालयांना देण्यात येते व त्यांच्याकडे असलेल्या वीज बिलाची थकबाकी रक्कम ही विविध कार्यालयामार्फत येणे आहे. माहे एप्रिल, २०१९ अखेर विविध कार्यालयांकडून म्हाडा, पोलीस, कारागृह, शासकीय कार्यालये इत्यादींकडून

रुपये १७.८६ कोटींची थकबाकी होती. संबंधित विविध कार्यालयांशी पाठपुरावा करुन सदर रक्कमेचा भरणा करुन घेण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) बेस्टने टाटा पॉवर कंपनीस आजपर्यंत वीज बिलाची थकीत रकमेपैकी रुपये २३४ कोटी इतकी रक्कम प्रदान केली आहे. तसेच बेस्टने टाटा पॉवर कंपनीस वीज पुरवठा खंडीत न करण्याची विनंती केली आहे व उर्वरित रक्कम टप्प्याटप्प्याने देण्याचे आश्वासन दिले आहे.

(५) बेस्ट उपक्रम मुंबई शहरास वीज पुरवठा व बृहन्मुंबई क्षेत्रात परिवहन सेवा देते. परिवहन सेवा तोटयात असल्यामुळे त्यासाठी लागणारा खर्च हा वीज पुरवठा विभागास होणाऱ्या शिल्लकी उत्पन्नातून करणे भाग पडते. त्यामुळे बेस्ट उपक्रमाला होत असलेल्या आर्थिक अडचणीमुळे टाटा पॉवर कंपनीची वीज बिले भरण्यास विलंब होत आहे.

-----------------

## राज्यातील साखर आयुक्तालयाच्या धर्तीवर स्वतंत्र पणन संचालनालयाची स्थापना करण्याबाबत

**(२६) * ४६७४९ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर आयुक्तालयाच्या धर्तीवर स्वतंत्र पणन संचालनालयाची स्थापना करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात निर्णय घेतला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन घेतलेल्या निर्णयाबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) यासंदर्भात पणन संचालक यांनी सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांच्या आस्थापनेवरील पदे,

पणन संचालनालयास द्यावयाची पदे व नव्याने निर्माण करावयाची पदे हे लक्षात घेऊन सुधारित आकृतिबंध सादर करण्याचे शासन पत्र दिनांक २३/०१/२०१९ व दिनांक ०७/०३/२०१९ नुसार सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात आले आहे.

सुधारित प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, वित्त विभागाच्या मान्यतेने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयांसाठी सुधारित आकृतिबंध निश्चित करता येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औद्योगिक वीज ग्राहकांच्या विद्युत देयकात वाढ झाल्याबाबत

**(२७) * ४६५८६ श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व औद्योगिक वीज ग्राहकांच्या विद्युत देयकात माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान २५ टक्के दरवाढ महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने केली असून राज्यातील वीज दर शेजारील सर्व राज्यांच्या तुलनेने २५ ते ४० टक्के जास्त झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची दरवाढ उद्योग क्षेत्रास मारक ठरणारी असल्यामुळे ती तातडीने मागे घ्यावी किंवा शासनाने विद्युत वितरण कंपनीस भरपाई देऊन दरवाढ पूर्वीप्रमाणे ठेवावी यासाठी राज्यातील सर्व औद्योगिक संघटनातर्फे लोकशाही मार्गाने माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील उद्योग इतर राज्यांच्या स्पर्धेत टिकण्यासाठी दरवाढ कमी करण्याबाबत वा दरवाढी एवढ्या रक्कमेची अनुदान स्वरुपात विद्युत वितरण कंपनीस देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक १२/०९/२०१८ च्या वीज दर आदेशानुसार महावितरण कंपनीच्या ग्राहकांकरीता सुधारित वीज दर दिनांक १/०९/२०१८ पासून लागु करण्यात आले. दिनांक १/०४/२०१९ पासून लागू झालेल्या वीज दरात सन २०१८-१९ च्या तुलनेत साधारण ३ टक्के वीज दरवाढ झाली आहे. उच्चदाब औद्योगिक ग्राहकांसाठी वीज दर वाढ २ टक्के इतकी झाली आहे. दिनांक १२/०९/२०१८ च्या वीज दर आदेशानुसार औद्योगिक ग्राहकांना वीज दरात १९.५ टक्के पर्यंत सवलती अनुज्ञेय आहेत. महावितरण कंपनीचे औद्योगिक वीज दर हे इतर राज्याच्या तुलनेत समकक्ष असल्याचे आढळून आले आहे.

(२) औद्योगिक ग्राहकांचे दर कमी करुन त्याची भरपाई शासनाने अनुदानामार्फत करावी अशा आशयाची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(३) विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी + क्षेत्रातील उद्योगांना शासनातर्फे इंधन समायोजन आकार, उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारीत सवलत तसेच नवीन उद्योगांना अतिरिक्त सवलत सन २०१६ पासून देण्यात येत आहे. याशिवाय विदर्भ व मराठवाडा विभागातील उद्योगांना वीज शुल्कात माफी देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमरी पठार (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील संत दोलाराम महाराज वृध्दाश्रमात पाण्याची व्यवस्था करण्याबाबत

**(२८) * ४७६५२ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी पठार (ता.आर्णी, जि.यवतमाळ) येथील संत दोलाराम महाराज वृध्दाश्रमाला पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याने येथील १०८ वृध्दांची पाण्याविना दैनावस्था होत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार यवतमाळ जिल्ह्यातील वृध्दाश्रमात पाण्याची व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) वृध्दाश्रमाची मान्यसंख्या २५ असून सद्य:स्थितीत १०७ वृध्द प्रवेशित आहेत. वृध्दाश्रमाकरीता पाण्याची व्यवस्था संस्थेमार्फत करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत पाण्याबाबत कोणत्याही प्रकारची अडचण नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वीज निर्मिती करण्यासाठी महानिर्मितीचे वीज संच कालबाह्य झाल्याबाबत

**(२९) * ४६७२० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यासाठी वीज निर्मिती करण्याची प्रमुख जबाबदारी असलेल्या महानिर्मितीचे १४७० मेगावॉट क्षमतेचे ७ वीज संच तसेच ४३२ मेगावॉट क्षमतेचे ४ वीज संच कालबाह्य झाल्याने वीज निर्मिती पूर्ण क्षमतेने न होणे, प्रदूषणात वाढ होणे आदी प्रकार वाढीस लागले असून, वीज निर्मिती कोणत्याही क्षणी बंद होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानिर्मितीची एकूण वीज निर्मिती क्षमता १३ हजार मेगावॅट तर औष्णिक प्रकल्पांची वीज निर्मिती क्षमता साडे अकरा हजार मेगावॅट आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भुसावळ, खापरखेडा, पारस, नाशिक, कोराडी, चंद्रपूर, परळी या वीज संचातून पूर्ण क्षमतेने वीज निर्मिती होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जुन्या वीज संचामुळे निर्माण झालेल्या व होणाऱ्या वीज निर्मितीवर परिणामकारकरीत्या मात करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) महानिर्मिती कंपनीची एकूण वीज निर्मिती क्षमता १३६०२ मे.वॅट असून त्यापैकी औष्णिक वीज निर्मिती क्षमता १०१७० मे.वॅट इतकी आहे.
(३) हे खरे नाही.

महानिर्मिती कंपनीच्या संचांचे संचलन महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने निर्देशित केलेल्या "मेरीट ऑर्डर डिस्पॅच" तत्वानुसार करण्यात येते. त्यानुसार भार प्रेषणकेंद्र, कळवा यांच्या निर्देशानुसार वीज संचातून क्षमतेनुसार वीज निर्मिती करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील शासकीय आश्रमशाळेत दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत

**(३०) * ४७१४९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रविंद्र फाटक, ॲड.अनिल परब, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) येथील शासकीय आश्रमशाळांतील दोन हजार आदिवासी विद्यार्थ्यांना टँकरचे दूषित पाणी प्यावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील शहापूर आदिवासी विकास प्रकल्प विभागांतर्गत शहापूर, मुरबाड व भिवंडी तालुक्यात एकूण २३ आश्रमशाळा असून या आश्रमशाळांपैकी बहुतांश ठिकाणी बोअरवेल आटल्याने व जवळपास

पाण्याचे स्त्रोत नसल्याने सुसटवाडी, सावरोली, मोरोशी, टाकीपठार, माल (विहिगांव), डोळखांब व चिंबी पाडा या आश्रमशाळांना भीषण पाणीटंचाई सहन करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पाणी टंचाईमुळे विद्यार्थ्यांना पिण्यासाठी, आंघोळ व शौचालयास पाणी नाही, यामुळे सर्व विद्यार्थ्यांमध्ये शारिरीक अस्वच्छता निर्माण होऊन त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वरील आदिवासी विद्यार्थ्यांना शुध्द पाणी देण्याकरीता शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक उईके :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सुसरवाडी येथील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना बोअरवेलव्दारे पाणीपुरवठा करण्यात येतो. पाण्यामध्ये टीसीएल टाकण्यात येऊन पाणी शुध्द करण्यात येते.

सावरोली येथील आश्रमशाळेत टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत असून टीसीएलव्दारे पाण्याचे शुद्धीकरण करण्यात येते.

मोरोशी येथील आश्रमशाळेत टाक्यातील पिण्याच्या पाणी शुध्दीकरणासाठी ६ अॅक्वागार्ड आणि २ RO HP५० या प्रकारच्या जलशुध्दीकरणाची व्यवस्था आहे.

टाकीपठार येथील आश्रमशाळेत टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत असून टीसीएलव्दारे पाण्याचे शुद्धीकरण करण्यात येते.

विहीगांव माळ येथील आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या जेवणासाठी व पिण्यासाठी विहिरीतून बैलगाडीव्दारे पाणी आणले जाते. सदर विहिरीत नियमित क्लोरीन टाकून पाणी शुध्द करण्यात येते. तसेच वेळोवेळी पंचायत समिती, पाणीपुरवठा विभागाकडून पाण्याचे नमुने तपासणी करण्यात येतात. बैलगाडीने आणलेले पाणी वॉटर फील्टरव्दारे शुध्द करून विद्यार्थ्यांना देण्यात येते.

डोळखांब येथील आश्रमशाळेतील विहिरीत टीसीएल पावडरचा पाणी स्वच्छतेसाठी वापर केला जातो. विहिरीतील पाणी कमी होण्याच्या कालावधीत टँकरव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. शाळेत आर.ओ. वॉटर कूलर बसविण्यात आले आहे.

चिंबीपाडा येथील आश्रमशाळेत विहीर असून विहिरीचे पाणी कमी झाल्याच्या कालावधीत विद्यार्थ्यांना जारव्दारे शुध्द पाणीपुरवठा करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) ग्रामीण भागातील यंत्रमाग उद्योग व कापड व्यवसाय पुन्हा सुरू करण्याबाबत

**(३१) * ४९१३९ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) ग्रामीण भागातल्या विविध क्षेत्रात वास्तव करणाऱ्या अनुसूचित जाती व जनजाती तसेच दुर्बल घटक इत्यादींना रोजगार उपलब्ध होण्यासाठी बंद पडलेले यंत्रमाग उद्योग व कापड व्यवसाय पुन्हा सुरू करून देण्याबाबत ‘समर्थन’ संस्थेने मा.मंत्री सहकार, पणन व वस्त्रोद्योग, मा.मंत्री उद्योग व खनिकर्म, मा.मंत्री कामगार, सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग व जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे दिनांक २० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व कार्यवाहीचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) १. वस्रोद्योग घटकांना वीज दरात सवलत देणेबाबतचा शासन निर्णय दिनांक २१ डिसेंबर, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

२. राज्यातील साध्या यंत्रमागांचे आधुनिकीकरण करण्याकरीता केंद्र सरकारच्या केंद्र पुरस्कृत Pilot Scheme of In-situ upgradation

of Plain powerloom for S.S.I. Sector या योजनेस राज्य शासनाची पुरक योजना शासन निर्णय दिनांक ६ जून, २०१८ नुसार सुरु करण्यात आलेली आहे.

३. राज्यातील भिवंडी, मालेगाव व सोलापूर या ठिकाणी पॉवरलूम मेगाक्लस्टर स्थापन करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने संबंधित जिल्हाधिकारी यांचेमार्फत प्रस्ताव सादर करण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणातील काजू बी उत्पादनास हमीभाव देण्याबाबत

**(३२) * ४७९१९ ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात काजू बी उत्पादन होत असून काजू बी करीता हमीभाव देण्याची कोणतीही योजना शासनाने तयार केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काजू "बी" चा उत्पादन खर्च सन २०१७-१८ या वर्षाकरीता रुपये १२२.९१ प्रतिकिलो एवढा दिला होता, प्रत्यक्षात सन २०१८-१९ या वर्षाकरीता केंद्र शासनाने आयातकर अर्ध्यावर आणल्यामुळे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान काजू "बी" ला फक्त रुपये ११०-१२० प्रतिकिलो एवढा कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उत्पादन खर्च रुपये १२२.९१ प्रतिकिलो अधिक ५० टक्के हमीभाव असे किमान रुपये १८५ प्रतिकिलोप्रमाणे काजू बी चा दर शेतकऱ्यांना देण्यात आलेला नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असून त्याची भरपाई देण्यासाठी व कोकणातील काजू बी उत्पादनास हमीभाव देण्याच्या योजनेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

कोणत्या शेतमालाला हमीभाव जाहीर करावा ही केंद्र शासनाच्या अखत्यारितील बाब आहे.

(२) होय.

केंद्र शासनाने आयातकर अर्ध्यावर आणल्यामुळे पाश्चमात्य देशातील काजू फार मोठ्या प्रमाणात भारतात आयात झाली. आयात झालेल्या काजू बी चा दर भारतातील दरापेक्षा कमी असल्याने कोकणातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या काजू बी ला कमी दर मिळत होते.

(३) कोणत्याही पिकाच्या उत्पादन खर्चाच्या माहितीच्या आधारे व विविध निविष्ठांच्या प्रचलित भावपातळी लक्षात घेवून उत्पादन खर्चावर आधारीत किंमती राज्याच्या कृषी विभागामार्फत केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाकडे प्रस्तावित करण्यात येतात, त्यास अनुसरून किमान आधारभूत किंमती केंद्र शासन जाहीर करते काजू बी चा समावेश यात नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कसारा (जि.ठाणे) येथील जंगलात गावठी दारुच्या भट्ट्या चालविल्या जात असल्याबाबत

**(३३) * ४८७१९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसारा (जि.ठाणे) येथील राड्याचा पाडा भागात असलेल्या फुगाळा या गावात दारुच्या भट्ट्या चालविल्या जात असल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन बेकायदा गावठी दारुच्या भट्ट्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे.

ठाणे जिल्ह्यातील कसारा येथील राड्याचा पाडा भागात असलेल्या फुगाळा गाव व परिसरात माहे मे, २०१९ मध्ये हातभट्टी दारू निर्मिती व विक्री याबाबत एकूण ९ गुन्हे नोंदविण्यात आले असून ५ इसमांना अटक करण्यात आली आहे. सदर कारवाईत ५७५५ लि. रसायन, ३० लि. गावठी दारु तसेच देशी-विदेशी मद्य जप्त करण्यात आले आहे. तसेच, या कारवाईत एकूण जप्त व नाश केलेल्या मुद्देमालाची किंमत रुपये १,१६,६५०/- इतकी आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत पोलीस विभागाशी समन्वय साधून संयुक्त मोहिमा तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत विशेष छापे मोहिम राबविण्यात येऊन अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री ठिकाणावर कारवाई केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेण (जि.रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(३४) * ४७८७६ श्री.अनिकेत तटकरे, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ४५९३० ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिलायन्स गॅस पाईपलाईन कंपनीने अल्प दरात शेत जमिनीचा मोबदला देऊन शेत जमीन संपादीत केल्यामुळे कळंद, जिरणे तुरामळ, चाफेगणी, बोरगाव, आमटेम, गागोदे (ता.पेण, जि.रायगड) येथील शेतकऱ्यांनी अनेक वेळा उपोषणे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपोषणकर्ते यांच्या समवेत भूसंपादन कंपनीचे प्रतिनिधी, पाईपलाईन कंपनीचे प्रतिनिधी यांची बैठक घेण्यात आली असून या बैठकीत नुकसान भरपाई पात्र सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याविषयी झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित शेतकऱ्यांना शेत जमिनीचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २२/१०/२०१८ रोजी उपविभागीय अधिकारी, पेण, उपोषणकर्ते, संपादन संस्थेचे प्रतिनिधी व सक्षम प्राधिकारी, दहेज-नागोठणे-ईथेन पाईपलाईन प्रकल्प यांची संयुक्तिक बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत जिल्हाधिकारी यांनी वाढीव नुकसान भरपाई कामी सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश संपादन संस्थेच्या प्रतिनिधींना दिले होते. तद्नंतर, पालकमंत्री जिल्हा रायगड यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३१/१०/२०१८ रोजी जिल्हाधिकारी, रायगड व उपविभागीय अधिकारी, पेण, सक्षम प्राधिकारी व संपादन संस्थेचे प्रतिनिधी तसेच उपोषणकर्ते यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत ज्या शेतकऱ्यांना समान दराने नुकसान भरपाई मिळाली नाही अशा आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी त्यांचे नुकसान भरपाईचे पत्र तहसिलदार, पेन व उपविभागीय अधिकारी, पेण यांच्या शिफारशीसह जिल्हाधिकारी, रायगड यांच्यामार्फत सक्षम प्राधिकारी, दहेज-नागोठाणे-इथेन पाईपलाईन प्रकल्प यांच्याकडे सादर करावा व त्यांनी शिफारस करून रिलायन्स गॅस पाईपलाईन लि. ने वाढीव मोबदला द्यावा व त्यांनी लवकरात लवकर कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या होत्या.

पालकमंत्री, जिल्हा रायगड यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३१/१२/२०१८ रोजी बैठक घेण्यात आली. त्या बैठकीत जिल्हाधिकारी, रायगड, उपविभागीय अधिकारी, पेण यांच्याकडून प्राप्त झालेल्या पेण व खालापूर तालुक्यातील १ ते १४८ शेतकऱ्यांच्या अर्जाची चौकशी प्रत्यक्ष जागेवर स्थळपाहणी व पंचनामा करून झालेल्या नुकसान भरपाईबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश पालकमंत्री जिल्हा रायगड यांनी दिले होते. त्यानुसार पंचनामा करून सक्षम प्राधिकारी यांच्यास्तरावरून प्रकल्प बाधितांना नुकसान भरपाईची रक्कम अदा केली आहे. त्याशिवाय संपादन संस्थेने काही प्रकल्प बाधितांना त्यांच्या स्तरावरून नुकसान भरपाईची रक्कम वाटप केली आहे.

तसेच ज्या पध्दतीने संपादन संस्थेने प्रकल्प बाधितांना रक्कम वाटप केली आहे त्याच पध्दतीने पंचनामा केलेल्या १४० प्रकल्प बाधितांना नुकसान भरपाई वाटप करण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत सक्षम प्राधिकारी, दहेज-नागोठाणे-ईथेन पाईपलाईन प्रकल्प यांनी संपादन संस्थेस कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मार्केटींग फेडरेशनच्या माध्यमातून हमीभाव केंद्राव्दारे विकलेल्या तूर व हरभरा यांचा मोबदला शेतकऱ्यांना मिळणेबाबत

**(३५) * ४८९६० श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहे मार्च-एप्रिल, २०१८ या कालावधीत राज्यातील शेतकऱ्यांनी मार्केटींग फेडरेशनच्या माध्यमातून हमीभाव केंद्राव्दारे विकलेल्या तूर व हरभरा यांचे १९७ कोटी रुपये शेतकऱ्यांना देण्यात आले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार शेतकऱ्यांना हमी भावाची रक्कम देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.
(२) हंगाम २०१७-१८ मधील तूरीची खरेदी दिनांक ०१/०२/२०१८ पासून व हरभरा (चना) खरेदी दिनांक ०१/०३/२०१८ पासून सुरु करण्यात आली होती. शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या शेतमालाची नोंद NeML पोर्टलवर केल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचे चुकारे ऑनलाईनद्‌वारे थेट बँक खात्यात जमा करण्यात येत होते. माहे एप्रिल, २०१८ अखेर तूरीची रुपये ३८१.०९ कोटी व हरभऱ्यांची रुपये १००.१९ कोटी अशी एकूण रुपये ४८१.२८ कोटी चुकारे अदा करणे बाकी होते. शिल्लक अदा करावयाची रक्कम नाफेडकडून प्राप्त झाली असून, ती अदा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांदिवली (पूर्व) मुंबई येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन उभारणेबाबत

**(३६) * ४८८१६ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ३३१९६ ला दिनांक २७ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (पूर्व) सर्व्हे नं. ८६ नगर भूमापन १७१/अ/१/२० या भूखंडावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर नालंदा बुध्दभवन समिती, समाजकल्याण महाराष्ट्र शासनाच्या डॉ.आंबेडकर भवन बांधण्याकरीता जागेचे मालक यांना जिल्हाधिकाऱ्यांकडून विशेष बाब म्हणून मान्यता मिळणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री यांना लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत लेखाशीर्ष ३६३६ अंतर्गत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश संस्थेस दिलेले असून याबाबतचा प्रस्ताव संस्थेमार्फत शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१), (२), (३) व (४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर नालंदा बुध्द भवन समिती, कांदिवली (पूर्व) मुंबई सर्व्हे नं. ८६ नगर भूमापन १७१/अ/१/२० या भूखंडावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

विभागाच्या दिनांक १६/१२/२०१५ च्या शासन निर्णय स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान मंजूर करावयाचे निकष व नियमावली यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर नालंदा बुध्द भवन समिती, कांदिवली (पूर्व), मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावात खालील त्रुटी आढळून आल्या आहेत.

१) सदर प्रकल्पाची जागा नो-डेव्हलपमेंट झोनमध्ये असून खाजगी मालकीची आहे. सदरील जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकर नालंदा बुध्द भवन समिती, कांदिवली (पूर्व) या संस्थेच्या नावावर झालेली नसल्याने सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

२) स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान या योजनेंतर्गत संबंधित संस्थेच्या खात्यात प्रकल्प खर्चाच्या १०% रक्कम जमा करणे अनिवार्य आहे. तथापि, सदर प्रस्तावात संस्थेकडे या कामासाठी एकूण अंदाजित खर्चाच्या १०% रक्कम जमा नाही.

३) सदरील संस्थेने मागील ३ वर्षातील सनदी लेखापालाने केलेल्या लेखापरिक्षणाचा अहवाल प्रस्तावासोबत सादर केलेला नाही.

-----------------

## राज्यातील शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिल्याबाबत

**(३७) * ४८१०४ श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकरी सन्मान योजना सुरु होऊन सुमारे २२ महिन्यांचा कालावधी उलटूनही लाखो शेतकरी कर्जमाफीपासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आचारसंहितेपूर्वी घोषित केलेल्या व त्यासाठी आर्थिक तरतूद केलेल्या योजनेसाठी आचारसंहितेचा अडथळा नसताना केवळ शासकीय अनास्था व दुर्लक्षामुळे लोकसभा निवडणूक, २०१९ च्या आचारसंहितेच्या काळात बँकांकडून मागणी येऊनही सुमारे ४०० कोटी रुपयांची कर्जमाफी शेतकऱ्यांना मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित ठेवण्यास कोण जबाबदार आहेत व त्यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख : (**१) नाही.

दिनांक ३१ मे, २०१९ अखेर एकूण ४३.७६ लाख पात्र शेतकऱ्यांना रुपये १८,४५७.४० कोटीचा कर्जमाफीचा लाभ देण्यात आला आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

आचारसंहितेपूर्वी बँकांना प्राप्त झालेल्या पात्र लाभार्थ्यांच्या ग्रीन लिस्टनुसार व अनुषंगिक रकमेनुसार आचारसंहिता काळात दिनांक ८ मार्च, २०१९ ते दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंत बँकांकडून अशा लाभार्थ्यांना रुपये १४५.२० कोटीचा लाभ देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकेर चौथाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे एम.एस.ई.बी. कंपनीने अनधिकृतपणे पोल लावल्याबाबत

**(३८) * ४९०५१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकेर चौथाडी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील काही शेतकऱ्यांच्या गट क्रमांक २५९३ (२) या जमिनीमध्ये एम.एस.ई.बी. कंपनीने जमीन मालकांची कोणतीही परवानगी न घेता त्यांच्या जमिनीमध्ये असलेली झाडे तोडून अनधिकृत पोल लावून जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जमिनीमधील एम.एस.ई.बी. कंपनीने लावलेले अनधिकृत पोल काढण्याबाबत व तोडलेल्या झाडाचे व जमिनीची नुकसान भरपाई मिळण्याबाबत मा.ऊर्जा मंत्री, प्रधान सचिव, ऊर्जा विभाग यांना दिनांक ३ नोव्हेंबर, २०१८ व दिनांक ३ मे, २०१९ तसेच अभियंता व उपअभियंता एम.एस.ई.बी. बोर्ड सावर्डे यांना दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे तक्रार केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पोल काढण्याबाबत व नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) कोकेर चौथाडी, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी येथील गट क्र. २५९३(२) मधून ५ लघुदाब वाहिनीचे पोल उभारुन सौभाग्य योजनेंतर्गत एका ग्राहकास त्याने हमी पत्र दिल्याने दिनांक ०३/०९/२०१८ रोजी घरगुती वीज जोडणी देण्यात आली होती. याकरीता कोणतीही वृक्ष तोड महावितरण कंपनीमार्फत करण्यात आली नव्हती. तद्नंतर दिनांक २६/०९/२०१८ रोजी सदर जागा मालकीबाबत अन्य ग्राहकाने तक्रार केल्याने प्राप्त कागदपत्रांची शहानिशा केल्यानंतर महावितरण कंपनीमार्फत सौभाग्य योजनेंतर्गत वीज जोडणी दिलेल्या ग्राहकाकडून पोल हटविण्याचा खर्च वसूल करुन सदर जागेतील तीन पोल हटविण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोटे आद्योगिक वसाहत (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील रासायनिक कंपन्यात लागणाऱ्या आगीच्या उपाययोजनेबाबत

**(३९) * ४७८८६ श्री.अनिकेत तटकरे, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ४५९२६ ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे अनेक रासायनिक कंपन्या कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केन केमिकल्स कंपनीत माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दुर्घटनेनंतर शासनाने जखमींना आर्थिक मदत दिली किंवा कसे याबाबत प्रशासनाकडे कोणतीच माहिती नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या दुर्घटनेनंतर पर्यावरण विभागाने हे रसायन मिश्रीत पाणी प्रक्रिया करुन पाईपलाईनव्दारे दुर समुद्रात सोडण्याविषयी सुचित केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केन केमिकल्स या कंपनीत दिनांक ०८/०९/२०१८ रोजी सुमारे ११.०० वाजता इलेक्ट्रीक शॉर्ट सर्किटमुळे कंपनीमध्ये रसायनांच्या ड्रमना आग लागली होती. या आगीमुळे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(३) पोलीस पंचनामा व औद्योगिक सुरक्षा संचालनालय यांनी दिनांक ०९/०९/२०१८ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार सदर आगीमध्ये कोणतीही जिवितहानी झाली असल्याचे आढळून आले नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत ताडी बनविण्यास क्लोरल हायड्रेट विषारी रसायनाचा वापर होत असल्याबाबत

**(४०) * ४८८२७ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ४३४५७ ला दिनांक १० जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत ताडी बनविण्यास क्लोरल हायड्रेया विषारी रसायनाचा वापर केला जात असल्याची बाब माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्लोरल हायड्रेटमुळे मळमळणे, चक्कर येऊन तोल जाणे, उलटी होणे किंवा अनेकदा बेशुध्द होणे असे प्रकार घडतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरात असलेल्या २५० दुकानात या दारूचा पुरवठा केला जात असल्याचे निदर्शनास आले असून पुरवठा करणाऱ्या व्यक्तीला पोलिसांनी अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व सदरहू गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) असे निदर्शनास आले नाही.
(३) व (४) सदर प्रकरणी आरे पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७८/२०१९, भा.दं.वि.सं. कलम ३२८, २७२, २७३, ३४ सह महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ कलम ६५ (ई), ७८ आणि विषारी पदार्थ अधिनियम, १९१९ कलम ६(१)(अ) अन्वये गुन्हा दाखल असून त्यामध्ये ३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

सदर ठिकाणी क्लोरल हायड्रेट या विषारी रासायनिक पदार्थाच्या एकूण ७८ गोण्या (वजन अंदाजे २१८४ कि.ग्रॅ.), प्रत्येकी २०००/- रुपये प्रमाणे एकूण रुपये ४३,६८,०००/- तसेच रुपये ४५,३४,३००/- इतकी किंमत असलेले साहित्य/माल जप्त करण्यात आलेले आहे. नमुद गुन्हा तपासाधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.